| MHST160009012012 | नियमित दिवाणी मु. क्र.३०३/२०१२<br>मधील नि.१६० वरील आदेश<br>राजेंद्र बबन काकडे वि. बबन मारुती काकडे वगैरे |
|---|---|

वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावादुरूस्ती करणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे यांचे असे म्हणणे आहे की, वादीने सदरचा दावा प्रतिवादीं विरुद्ध मौजे वेलंग, ता. वाई, जि. सातारा येथील एकत्र कुटुंब मिळकती अनुक्रमे स.नं.१४५/९, १४५/६, ११३/५, १४७/३ व ८७/१ वगैरे मिळकतींच्या वाटपासाठी दाखल केल आहे.

३. वादीचे पुढील कथन असे केले आहे की, सदर दाव्याचे कामी मुळ दाव्यातील प्रतिवादी क्र.१ कै. बबन मारुती काकडे या मयत झाल्याने निशाणी ९५ प्रमाणे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी दुरुस्ती अर्ज देण्यात आला होता. सदर दुरुस्ती अर्ज न्यायालयाने मंजूर केल्याप्रमाणे सदर दुरुस्ती अर्जामध्ये कै. बबन मारुती काकडे यांचे मयत वारस म्हणून प्रतिवादी क्र.२,३,४ व ५ असा मयत वारस म्हणुन दुरुस्ती करण्यात आलेली होती.

४. वादीचे पुढील कथन असे केले आहे की, तथापी दाव्याचे कामी दावा दुरुस्त केल्यानंतर नजरचुकीने दावा दुरुस्त प्रत देतेवेळी प्रतिवादी क्र.१ कै. बबन मारुती काकडे यांचे नाव कमी करुन त्याऐवजी मुळ प्रतिवादी क्र.२ यास प्रतिवादी क्र.१ असे नमुद करुन त्याच क्रमांकाने पुढील अंक लिहण्यात आले. कै. बबन मारुती काकडे यांचा मुळ प्रतिवादी क्र.१ मयत असे अस्तीत्वात ठेवून प्रतिवादी क्र.२ यास देण्यात आलेला अ.क्र.१ व तद्नंतर बाकी प्रतिवादींचे अंकांत सदरचे अर्जात नमूद केलेप्रमाणे मजकूर अंक व मजकुर घालण्यास व त्याप्रमाणे दुरुस्ती होवून मिळण्यास परवानगी दयावी अशी विनंती केली आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. मुळ दाव्याबाबत कोर्टाचे ऑनलाईन रेकॉर्ड सदरी प्रतिवादी यांची नावे पाहिली असता ती दुरुस्ती अर्जाप्रमाणेच नोंद आहेत. त्यामुळे मुळ दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होत नाही. याउलट प्रस्तुत

दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे. अर्ज मंजूर करण्यात यावा.

५. सदर अर्जावर प्रतिवादीने निशाणी १६३ वर म्हणणे दाखल केले असून अर्जातील मजकुर अमान्य केला आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार वादीने सदरचा दावा दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. दाव्याचे कामकाज दावा दुरुस्त करण्यावर प्रलंबीत आहे. वादीने निशाणी १४५ वरील दुरुस्ती अर्जाप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती केली आहे. दिनांक २४.७.२०२४ रोजी दुरुस्ती प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. दाव्याच्या दुरुस्ती प्रतीमध्ये दुरुस्ती करण्याची कोणतीही कायदेशीर तरतुद नाही. वादीने अर्जाचे कामकाज लांबवण्याच्या व प्रतिवादीस त्रास देण्याच्या हेतुने अर्ज केला आहे. अर्ज रद्द करण्यात यावा.

६. वादीचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा, प्रतिवादींविरूध्द वाटप होऊन मिळणेकरीता दाखल केला आहे. वादी मागत असलेली दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच दाव्याचे स्वरुपातही बदल होणार नाही. याउलट दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्याकरीता सदरची दुरुस्ती मंजूर करणे योग्य होणार आहे. सबब दाव्याचे स्वरुप विचारात घेता व दाव्याचे अंतिम निराकरण होण्याकरीता अर्ज मंजूर करणे योग्य होईल. करिता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

आ दे श

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने अर्जात नमुद केलेली दुरुस्ती १४ दिवसांचे आत करावी व दुरुस्त प्रत पुढील तारखेस दाखल करावी.

SMRUTI SAGAR PALSULE

Digitally signed by SMRUTI SAGAR PALSULE
Date: 2025.01.08 17:49:07 +0530

ठिकाण - वाई.
दिनांक – ०७.०१.२०२५

(एस. एस. पळसुले)
तिसरे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.